महाराष्ट्र पोलीस
सदरक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

विशेष पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ

दिनांक : ०३/११/२०२२

## नेर शहरात घरफोडी करणाऱ्या टोळीच्या स्थानिक गुन्हे शाखेने आवळल्या मुसक्या

जिल्हयातील वाढत्या घरफोडी व चोरीचे गुन्हयांना प्रतिबंध करुन आजपावेतो दाखल झालेले गुन्हे तात्काळ उघडीस आणनेकरीता मा. पोलीस अधीक्षक डॉ. श्री. पवन बन्सोड यांनी अशा प्रकारचे सर्व गुन्हयांचा समांतर तपास करुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केले होते त्यावरुन पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी स्था.गु.शा. कडील पथकांना दिलेल्या निर्देशावरुन स्थानिक गुन्हे शाखेकडील पोउपनि सागर भारस्कर हे पो.स्टे. नेर येथे दिनांक १४/०९/२०२२ रोजी दाखल अप.क्र. ४४०/२०२२ कलम ४५४,४५७,३८० भादवि. गुन्हयाचा समांतर तपास करीत होते.

पोउपनि सागर भारस्कर यांनी तांत्रीक बाबींचा आधार घेवुन गुन्हयात आरोपी नामे **शेख समीर शेख इसराईल रा. बेंडकीपुरा, यवतमाळ** याला निष्पन्न करुन त्यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने सदरचा मोबाईल व इतर एक मोबाईल हा इसम नामे **अतुल राजु चांदेकर रा. हिवरा कावरे ता. देवळी जि. वर्धा ह.मु. यवतमाळ** व इतर एक यांचेकडुन विकत घेतला असल्याची कबुली दिली वरुन इसम नामे अतुल राजु चांदेकर रा. हिवरा कावरे ता. देवळी जि. वर्धा ह.मु. यवतमाळ यास ताब्यात घेवुन अधिक तपास केला असता आरोपी अतुल राजु चांदेकर रा. हिवरा कावरे ता. देवळी जि. वर्धा ह.मु. यवतमाळ याने त्याचा साथीदार व यातील प्रमुख आरोपी याचे सोबत मिळुन नेर येथे घरफोडी केल्याची कबुली दिली. अशाच चोरीतील ०१ कॅमेरा सुध्दा गहाण ठेवला असल्याची कबुली दिली. गुन्हयात आरोपी शेख समीर शेख इसराईल रा. बेंडकीपुरा, यवतमाळ याचे कडुन ०२ मोबाईल किमंत ८०००/रु व इतर साक्षीदार यांचे कडुन ०१ कॅमेरा किमंत १०,०००/रु असा एकुण १८,०००/- रु किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन गुन्हयातील प्रमुख आरोपी फरार असुन त्याचा शोध सुरु असुन अधिक तपास सुरु आहे.

गुन्हयातील आरोपी नामे **१) अतुल राजु चांदेकर रा. हिवरा कावरे ता. देवळी जि. वर्धा ह.मु. यवतमाळ २) शेख समीर शेख इसराईल रा. बेंडकीपुरा, यवतमाळ** यांना पुढील कार्यवाही कामी पो.स्टे. नेर यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास सुरु आहे. नमुद आरोपीतांकडुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. खंडेराव धरणे, यांचे मार्गदर्शनात श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, सपोनि विकास मुंडे सायबर सेल यवतमाळ, सपोनि अमोल मुडे, पोउपनि योगेश रंधे, पोउपनि सागर भारस्कर, शाम बोपचे, पोहवा बंडु डांगे, उल्हास कुरकुटे, पो.ना. महेश नाईक, विनोद राठोड, निलेश राठोड, हरीष राऊत, मो. ताज, धनंजय श्रीरामे, रजनिकांत मडावी, सतीश फुके स्थागुशा यवतमाळ तसेच मपोशी रोशनी जोगळेकर सायबर सेल यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

३.११.

(प्रदीप परदेशी)
पो.नि. स्था.गु.शा. यवतमाळ

Scanned with OKEN Scanner